प्रशासकीय मान्यता

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे कर्करोग उपचाराच्या सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी रेडीओथेरेपी विभागाचे श्रेणीवर्धनअंतर्गत आवश्यक असलेले बांधकाम नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर (एनआयटी) या संस्थेमार्फत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक : जीसीएन-२०१७/प्र.क्र.०९/प्रशा-१

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नविन मंत्रालय, ९ वा मजला,

लोकमान्य टिळक रोड, मुंबई - ४०० ००१.

दिनांक : ०६ मार्च, २०१९.

वाचा :

१) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक : संवैशिवसं/ शावैमनागपूर/रेडिओथेरपीप्रस्ताव/९६८०/प(आय)/२०१७, ९२, दिनांक : ०३.०१.२०१७ व संवैशिवसं/शिकाना/कर्करोग उपचार केंद्र/ प्रस्ताव/८०/ अ,म,आय, दिनांक २१.१२.२०१७.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन पत्र, क्रमांक : बैठक-२०१८/१११५/प्र.क्र.४०७/प्रशा-१,दिनांक ०४.१२.२०१८.

३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्रमांक : सुविधा-२०१७ /प्र.क्र.४४४/प्रशा-१, दिनांक १८.१२.२०१८.

प्रस्तावना :

विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या रेडिओथेरेपी विभागाचे श्रेणीवर्धन करण्यास व तसेच तेथे कर्करोग उपचाराच्या अत्याधुनिक सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी उपरोक्त नमूद शासन निर्णय दिनांक १८.१२.२०१८ अन्वये शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर संस्थेत कर्करोग उपचाराच्या आवश्यक सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी संचालनालयाने विभागास सादर केलेल्या बांधकाम विषयक प्रस्तावास मान्यता देणे तसेच सदर बांधकाम नगर विकास विभागाच्या नियंत्रणाखालील नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर या संस्थेमार्फत करून घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेमध्ये कर्करोग उपचाराच्या सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी रेडिओथेरपी विभागाचे श्रेणीवर्धन

करण्याकरीता आवश्यक असलेले रुपये ७६१०.५८ लक्ष (अक्षरी रुपये शहात्तर कोटी दहा लक्ष अठ्ठावन्न हजार फक्त) इतक्या रकमेच्या खर्चाच्या बांधकाम अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेली सहमती व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिनांक १०.०८.२०१८ रोजी बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	स्थापत्य दुरुस्ती बांधकामाचे नाव	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये (लक्ष)	सचिव समितीने मान्यता दर्शविलेली किंमत रुपये (लक्ष)
१.	शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे कर्करोग उपचाराच्या सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी रेडीओथेरेपी विभागाचे श्रेणीवर्धनअंतर्गत बांधकाम करणे.	६३५०.१३	७६१०.५८
	एकूण	६३५०.१३	७६१०.५८

२. सदर बांधकाम राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर या संस्थेमार्फत करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर बांधकामासाठी खालील लेखाशीषाअंतर्गत निधी मंजूर करण्यात येईल.

मागणी क्रमांक एस-४

४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०३ वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन
१०५ विषमचिकित्सा - राज्य योजनांतर्गत योजना
(००) (५३) शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालयांची विनिर्दिष्टीत कामे केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील सार्वजनिक उपक्रम असलेल्या कंपनीकडून वा तत्सम कंपनीकडून टर्न की तत्वावर करुन घेणेबाबत
४२१० २६२५
५३-मोठी बांधकामे

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला - उप विभाग पाच मधील महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार मधील अ.क्र.१, परिच्छेद क्रमांक १३४ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान

केलेल्या अधिकारानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८५/इमा-३, दिनांक २६.०२.२०१८ अन्वये प्राप्त सहमती, सचिव समितीने दिनांक १०.०८.२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेली मान्यता तसेच शासन मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०६११११५२६६५१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2019.03.06 15:21:47 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), नागपूर, महाराष्ट्र.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अध्यक्ष, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
७. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम नागपूर प्रादेशिक विभाग, नागपूर.
८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
९. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर.
१०. सार्वजनिक बांधकाम विभाग, (इमारत-१/३) मंत्रालय, मुंबई.
११. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, एकात्मिक घटक (वैद्यकीय), नागपूर.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१३. निवडनस्ती (प्रशा-१)